**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.१२३/२०११-१२/ दिनांक :

१) डॉ. श्री. संजय धों. गाताडे,
मु.पो. मालगांव, ता. मिरज, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली
सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रा. उप विभागीय कार्यालय क्र. १, मिरज, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य

..२..

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>संयुक्त न्याय निर्णय</u>**

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

डॉ. श्री. संजय धों. गाताडे, रा. मालगांव, ता. मिरज, जि. सांगली यांनी आपणांस शेती वापराकरिता ५ अश्वशक्ती इतकी वीज जोडणी मिळावी म्हणून दि. १८.२.२०११ रोजी रितसरअर्ज केलेला होता. त्यांना विहीत मुदतीत वीज जोडणी न मिळाल्याने प्रथमतः अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दि. २.६.२०११ रोजी ' क्ष ' नमुन्यात अर्ज दिला होता.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

त्याचा निर्णय अंतर्गत कक्षाने दि. १०.८.२०११ रोजी दिला. सदरचा निर्णय मान्य न झाल्याने श्री. गाताडे यांनी दि. १०.९.२०११ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांच्याकडे ' अ ' नमुन्यात अर्ज सादर केला आहे. मंचाने अर्ज दाखल करुन घेऊन वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व दि. ९.११.२०११ रोजी मंच कार्यालयात सुनावणीची वेळ निश्चित केली. सुनावणीचेवेळी ग्राहक स्वतः उपस्थित, तसेच वि.प.तर्फे मिरज गामीण उप विभाग १ चे सहाय्यक अभियंता श्री. आर.एन. चव्हाण उपस्थित.

श्री. गाताडे यांनी आपल्या मागणीमध्ये दि. १८.२.२०११ रोजी गट क्र. २५६१ मालगांव येथे ५अश्वशक्तीची वीज जोडणी शेती वापरासाठी मिळावी म्हणून अर्ज केला आहे. श्री. गाताडे यांना दि. १३.५.२०११ रोजी फर्म कोटेशन मिळाले. त्याचदिवशी त्यांनी कोटेशनची रक्कम वि.प.कडे जमा केली व चाचणी अहवाल दिला. तथापि, चाचणी अहवाल खोटा आहे अशी चुकीची तक्रार केल्यामुळे श्री. गाताडे यांनी प्रथमतः ' क्ष ' नमुन्यात अंतर्गत कक्षाकडे व नंतर ' अ ' नमुन्यात मंचाकडे तक्रार सादर करुन वीज जोडणी मिळावी अशी तक्रार नोंद केली आहे, तसेच रु. ३०,०००/- शेती नुकसानीची भरपाई मिळावी असेही आपल्या अर्जात नमूद केले आहे. जाणूनबुजून विलंब करण्याच्या उद्देशाने कोटेशन देत असतांना ते कमी रकमेचे देवून वेळकाढूपणा केला आहे व सदरची रक्कम रु. १,०००/- दि. ६.६.२०११ रोजी भरुन घेतली आहे. तरी प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करुन मजला वीज जोडणी मिळण्याचा आदेश व्हावा असे आपल्या विनंती अर्जात नमूद केले आहे. तसेच भरपाई मिळावी असेही ' अ 'नमुन्यात नमूद केले आहे.

वितरण कंपनीने आपल्या म्हणण्यामध्ये ग्राहकाचा अर्ज प्राप्त झाला आहे, कोटेशनची रक्कम तसेच जादा रक्कम ग्राहकाने भरली आहे, चाचणी अहवालही दिला आहे मात्र मागणी जागेवर चाचणी अहवालाप्रमाणे विद्युत संच व मोटार याची मांडणी केलेली नाही त्यामुळे खोटा चाचणी अहवाल दिला असल्याने विद्युत जोडणी देण्यास विलंब झाला आहे असे नमूद केले आहे. तसेच ग्राहकाच्या अगोदर बऱ्याच ग्राहकांनी रकमा जमा करुन सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन प्रतिक्षायादीमध्ये आपली नांवे नोंदविली आहेत. श्री. गाताडे यांचा प्रतिक्षायादीतील क्रमांक ३९ असल्याने तसेच टर्नकी बेसीसवर (Turnkey work) काम करण्यासाठी ऑर्डर व सदर ग्राहकास वीज जोडणी देण्याबद्दल मक्तेदारास कळविले आहे, त्याप्रमाणे दि. २४.१०.२०११ रोजी ग्राहकास वीज पुरवठा दिला आहे. त्यामुळे ग्राहकाची मूळ मागणी मंजूर झालेली आहे. तसेच ग्राहकाने वेगवेगळ्या शासकीय कार्यालयास केलेले अर्ज गैरसमजुतीने केले असल्यामुळे मागे घेत असल्याचे कंपनीस लेखी कळविले आहे. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज मागणी पूर्ण झाली असल्याने तसा आदेश मंचाने पारीत करावा अशी विनंती वि.प.च्या वतीने करण्यात आली आहे.

ग्राहक श्री. गाताडे व वि.प. यांनी मांडलेली आपली बाजू, दाखल केलेली कागदपत्रे व सुनावणी दरम्यानची कथने, यावरुन खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित होतात.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मुद्दा क्र.१ : ग्राहकास वीज मागणी अर्जाप्रमाणे मुदतीत फर्म कोटेशन व त्यानंतर वीज जोडणी दिली आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र.२ : दोन्हीही बाबतीत विलंब झाला असल्यामुळे विलंब भरपाई देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

अंतिम आदेशाप्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

श्री. गाताडे यांनी दि. १८.२.२०११ रोजी ५अशशक्ती इतक्या भारासाठी सर्व कागदपत्रांसह अर्ज केल्याचे दिसून येते. तथापि, सदर ग्राहकास फर्म कोटेशन दि. १३.५.२०११ रोजी दिलेले आहे. विनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज दिल्यापासून ३० दिवसांचे आंत कोटेशन देणे आवश्यक आहे. तथापि, तशी कृती वि.प.कडून झालेली नाही. दि. १८.३.२०११ पर्यंत फर्म कोटेशन देणे विनियमास अनुसरुन होते, तथापि, दि. १३.५.२०११ ला कोटेशन दिल्याने दि. १८.३.२०११ ते दि. १३.५.२०११ इतक्या कालावधीचा विलंब झालेला दिसून येतो. त्यानंतर एल.टी.एक्स्टेंशन ०.२४ कि.मी. इतके असल्याने तरतुदीप्रमाणे ३ महिने होणे अगोदर वीज जोडणी चालू करुन देणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ, दि. १२.८.२०११ पर्यंत जोडणी मिळणे योग्य होते. सदरची जोडणी दि. २४.१०.२०११ रोजी दिलेली आहे. सर्व साधारण अडीच महिने इतका विलंब जोडणी देण्यास झालेला आहे.

सर्व बाजूंनी विचार करतां, दि. १६.२.२०११ चा अर्ज ही तारीख निश्चित असल्याने त्यानंतर ३० दिवस या तरतुदीचा विचार करुन दि. १८.३.२०११ व त्यानंतर कोटेशनची रक्कम जमा करुन चाचणी अहवाल दिल्यावर ३ महिने म्हणजेच दि. १८.६.२०११ पर्यंत जोडणी देणे विनियमास अपेक्षित आहे. परंतु दोन्ही बाबतीत विलंब झाल्याचे दिसून येत असल्याने भरपाई देणे योग्य आहे. तथापि, सुनावणीचेवेळी ग्राहकाने वीज जोडणी मिळाली आहे, गैरसमजुतीतून अर्ज केलेले आहेत, त्यामुळे भरपाईची मागणी मागे घेत असल्याचे मंचासमोर नमूद केले आहे. त्यामुळे भरपाई देणे योग्य असूनही ग्राहकाने निवेदन केल्यामुळे भरपाईची रक्कम देणे व्यवहार्य नाही असे मंचाचे मत झाले आहे. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर ' नाही ' व मुद्दा क्र. २ चे उत्तर ' होय ' असे नमूद केले असले तरी सर्व बाबींचा विचार करुन मंचाने सदरचा निर्णय घेतला आहे. तथापि, अर्ज केल्यानंतर ग्राहकास मिळणारी वागणूक योग्य नसल्याने वि.प.च्या संबंधितांच्या विरुध्द तक्रारी दाखल होत आहेत. सन १९५६ च्या नियमाप्रमाणे वीज वाहिनी उभी करुन ग्राहकास चाचणी अहवाल देणेविषयी लेखी कळविणे हे अपेक्षित आहे. या बाबीचा विचार वि.प.च्या संबंधितांनी करणे आवश्यक आहे. असे न होता, चाचणी अहवाल खरा की खोटा, मांडणी केली आहे किंवा नाही, आपल्याच कनिष्ठ अभियंत्याने दिलेला अहवाल योग्य की अयोग्य या बाबीत निष्कारण पत्र-व्यवहार झाल्याने ग्राहकाची गैरसमजूत झाल्याचे दिसून येते.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message, purchase the product at www.SmartPDFCreator.com

त्यामुळेच तहसिलदार, पोलीस स्टेशन, इ. शासकीय कार्यालयास तक्रारी वजा अर्ज व नंतर मागे घेणे इ. बाबी घडल्या आहेत. वि.प.ने आपली कागदपत्रे तयार करतांना कांही चुकीच्या नोंदी घालणे, कमी रकमेचे कोटेशन देणे, कोटेशनच्या फॉर्मवर अर्जाची चुकीची नोंद घालणे, अश्वशक्तीचा ५ ऐवजी ३ असा उल्लेख करणे ( प्रतिक्षायादीवर ) इ. बाबी दिसून येतात. त्यामुळे वि.प.नेही आपले कागद तयार करतांना योग्य ती खबरदारी घेणे व अर्जासंबंधी विनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यायोगे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच व संबंधितांकडून वेळ व पैसा याचा नाश होणार नाही याची दक्षता पुढील काळात वि.प.ने घेणे योग्य आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे.सबब मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) ग्राहकास मागणी प्रमाणे ५ अश्वशक्ती इतकी वीज जोडणी दिली असल्याने तसेच भरपाई नको असलेबद्दल मंचासमोर ग्राहकाने निवेदन केले असल्यामुळे सदरचा अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com